# अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - १४ ऑगस्ट, २०२०.

**महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६.**

**क्र. इएलडी-२०२०/प्रक्र-३४/ऊर्जा-१.-** ज्याअर्थी, शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक. **इएलडी.२०१६/प्रक्र-२५२/ऊर्जा-१,** दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६ (यानंतर ज्याचा उल्लेख "सदर अधिसूचना" असा करण्यात येईल) अन्वये महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (महा. २०१६ चा २६) च्या कलम ३ च्या पोटकलम १ आणि अनुसूची क, ख व ग अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने सदर अधिसूचने सोबतच्या तक्ता "अ" मधील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या प्रशुल्क प्रवर्गाने वापरलेल्या वीजेवर उक्त तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेले विद्युत शुल्काचे दर विनिर्दिष्ट केले आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर अधिसूचने सोबतच्या तक्ता "अ" मधील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या औद्योगिक प्रवर्गासाठी सदर तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेले विद्युत शुल्काचे दर सार्वजनिक हितास्तव कमी करणे आवश्यक आहे, अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ;

आता त्याअर्थी, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (महा. २०१६ चा २६) च्या कलम ३ च्या पोटकलम १ आणि अनुसूची क, ख व ग अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याव्दारे उपरोक्त बाबीसाठी सदर अधिसूचने सोबतच्या तक्ता "अ" मध्ये माहे ऑगस्ट, २०२० च्या बिलींग महिन्यापासून खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

सदर अधिसूचने सोबतच्या तक्ता "अ" मधील अ.क्र. ६ साठी असलेली नोंद खालील नोंदीप्रमाणे बदलण्यात यावी :-

"६ भाग च : औद्योगिक वापर आकाराच्या ७.५० टक्के"

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे
आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundlik Badgeri Digitally signed by Prashant Pundlik Badgeri DN: CN = Prashant Pundlik Badgeri, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Industry Energy and Labour Department Date: 2020.08.31 16:03:09 +05'30'

**प्र. पुं. बडगेरी**
**शासनाचे उप सचिव.**